# स्मृतिभ्रंशावरील उपचारांचा धोकाच अधिक

आरोग्य वार्ता

**नवी दिल्ली :** रुग्णांच्या मेंदूत मोठ्या प्रमाणात आढळणाऱ्या प्रथिनांना लक्ष्य करून स्मृतिभ्रंशावर उपचार करण्यासाठी तयार केलेल्या औषधांचे वैद्यकीयदृष्ट्या कोणतेही महत्त्वपूर्ण सकारात्मक परिणाम होत नाहीत आणि त्यामुळे मेंदूमध्ये रक्तस्राव व सूज येण्याचा धोका वाढतो, असे अभ्यासाच्या एका नवीन पुनरावलोकनात आढळून आले आहे.

इटलीतील बोलोग्ना येथील आयआरसीसीएस इन्स्टिट्यूट ऑफ न्यूरोलॉजिकल सायन्सेसच्या संशोधकांनी स्मृतिभ्रंशामुळे सौम्य संज्ञानात्मक कमकुवतपणा किंवा सौम्य स्मृतिभ्रंश असलेल्या २०,३०० हून अधिक सहभागींचा समावेश असलेल्या १७ चाचण्यांमधील माहितीचे विश्लेषण केले.




दरम्यान, संज्ञानात्मक घट आणि स्मृतिभ्रंशाच्या तीव्रतेवर औषधांचा प्रत्यक्ष परिणाम अगदीच कमी होता, जो किमान वैद्यकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण फरकासाठी निश्चित केलेल्या मर्यादेपेक्षा खूपच कमी होता, असा निष्कर्ष 'कोक्रेन डेटाबेस ऑफ सिस्टिमॅटिक रिव्ह्यूज'मध्ये प्रकाशित झाला आहे.

सौम्य संज्ञानात्मक कमकुवतपणा किंवा सौम्य स्मृतिभ्रंश असलेल्या लोकांमध्ये, मेंदूतून मेणासारखे प्रथिने यशस्वीरीत्या काढून टाकणे हे वैद्यकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण परिणामांशी संबंधित असल्याचे दिसत नाही. तसेच ही औषधे मेंदूतून मेणासारखी प्रथिने यशस्वीरीत्या काढून टाकतात, परंतु यामुळे कोणताही महत्त्वपूर्ण वैद्यकीय फायदा होत नाही.

# टीसीएस प्रकरणी दोन संशयितांना पोलीस कोठडी

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नाशिक :** टीसीएस बहुराष्ट्रीय कंपनीतील विनयभंग, अश्लील टिप्पणी प्रकरणी दाखल गुन्ह्यात संशयित शफी शेख आणि रझा मेमन यांना न्यायालयाने १८ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. संशयितांवर याच प्रकरणात आणखी काही गुन्हे दाखल आहेत. दुसरीकडे, टीसीएसच्या नाशिक प्रकल्पात कार्यरत दीडशेहून अधिक कर्मचारी सध्या घरून काम म्हणजे 'वर्क फ्रॉम होम' करीत आहेत.

टीसीएस कंपनीत मागील चार वर्षांत महिलांवर अन्याय, अत्याचार, धर्मांतराचा प्रयत्न, मांसाहार करायला भाग पाडणे, विशिष्ट प्रार्थना व उपवास करायला लावणे आदी प्रकार घडल्याचे उघड झाले. या प्रकरणी आठ जणांविरुद्ध नऊ स्वतंत्र गुन्हे दाखल आहेत. या प्रकरणात दानिश शेख (३१) तौफिख अत्तार (३४), शाहरूख हुसैन कुरैशी (३४) रझा मेमन (३५), असिफ अन्सारी, शफी शेख आणि अश्विनी चैनानी (५१, लुलानगर, पुणे) यांना अटक झाली आहे. सध्या हे संशयित न्यायालयीन कोठडीत आहेत. यातील संशयित निदा खान मात्र अजूनही पोलिसांच्या हाती लागलेली नाही.

### टीसीएसमध्ये तूर्तास 'वर्क फ्रॉम होम

टीसीएसच्या नाशिक प्रकल्पातील धक्कादायक प्रकार समोर आल्यानंतर कर्मचारी वर्गात अस्वस्थतेचे वातावरण आहे. या काळात कंपनीच्या प्रवेशद्वारावर गेल्या आठवड्यात भाजपने आंदोलन केले होते. गुरुवारी सकल हिंदू समाजाच्यावतीने दुचाकी जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. कंपनीत घडलेल्या घटनांची दखल घेत व्यवस्थापनाने चौकशी सुरु केली असून, तूर्तास या प्रकल्पातील सर्व कर्मचाऱ्यांना 'वर्क फ्रॉम होम' अर्थात घरून काम करण्यास सांगण्यात आले आहे. कामगार उपायुक्त कार्यालयातील निरीक्षक विशाल गोळे यांनी टीसीएसमध्ये भेट देऊन माहिती घेतली.

कारागृहात असणाऱ्या शफी शेख आणि रझा मेमन या दोघांना पीडितेशी शारीरिक जवळीक निर्माण करण्याच्या गुन्ह्यात अटक झाली आहे. संशयितांनी पीडितेच्या खासगी आयुष्याबाबत वारंवार चर्चा केली. शफीने प्रेमाचा प्रस्ताव ठेवला. तर रजा मेमनने तक्रारदाराच्या शरीरावर अश्लील टिप्पणी केली. हे दोघे संशयित पीडितेशी अंगलट करायचे, असे तक्रारीत म्हटले आहे. या प्रकरणात दोघांना न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी बचाव पक्षाच्या वकिलांनी एकाच वेळी गुन्हे घडले असताना गुन्हे नोंदवहीत सर्व गुन्ह्यांचा तपास पोलिसांनी करायला पाहिजे, असा मुद्दा मांडला.

त्यावर सहायक संचालक व सरकारी अभियोक्ता किरण बेंढभर यांनी प्रतिवाद केला. संशयितांची गुन्हा पद्धत जरी एकसारखी असली तरी पीडिता या वेगवेगळ्या आहेत. गुन्ह्याचा कालावधी आणि हकीकत वेगवेगळी आहे. तसेच संशयित रजाविरुद्ध तीन आणि शफीविरुद्ध चार गुन्हे दाखल आहेत. संशयिताचा भ्रमणध्वनी जप्त झाल्यानंतर आणखी काही गुन्हे अथवा इतर संशयितांचा सहभाग निष्पन्न होऊ शकतो. त्यामुळे त्यांना सहानुभूती न दाखवता पोलीस कोठडी देण्याची मागणी बेंढभर यांनी केली. न्यायालयाने दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकून संशयितांना १८ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली.




## कुपवाडमध्ये महिलेचा खून; संशयिताला अटक

**सांगली :** अनैतिक संबंधाला विरोध करत असल्याच्या कारणावरून मुलानेच तोंडावर उशी दाबून आईचा खून केल्याची घटना कुपवाडनजीक मानमोडी या गावी गुरुवारी सकाळी उघडकीस आली. या प्रकरणी संशयित तरुणाला पोलिसांनी अटक केली आहे. याबाबत कुपवाडमधील औद्योगिक वसाहत पोलीस ठाण्यातून मिळालेल्या माहितीनुसार मानमोडी (ता. मिरज) येथे गुरुवारी सकाळी संगीता जीवन झेंडे (वय ४८) या महिलेचा संशयास्पद मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले.

# 'एफआरपी' न दिल्यास साखर कारखान्यांविरुद्ध आंदोलन

**कराड :** राज्यातील अनेक साखर कारखान्यांकडून शेतकऱ्यांना अद्याप पूर्ण एफआरपी (रास्त आणि किफायतशीर किंमत) न मिळाल्याने नाराजी वाढत असून, रयत क्रांती संघटना आक्रमक झाली आहे.

'रयत क्रांती'चे पश्चिम महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष, ऊस नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिन नलवडे यांनी साखर आयुक्तांना पत्र पाठवत आठ दिवसांची मुदत दिली होती. मात्र, अद्यापही बहुतांश कारखान्यांनी एफआरपीची पूर्ण रक्कम अदा न केल्याने येत्या मंगळवारपासून संबंधित कारखान्यांविरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.



**कृष्णा साखर कारखान्याचे अध्यक्ष डॉ. सुरेश भोसले यांचा सत्कार करताना, समवेत सचिन नलवडे व अन्य.**

कराड तालुक्यातील कृष्णा सहकारी साखर कारखाना आणि जयवंत शुगर या दोन साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांना पूर्ण एफआरपी दिल्याने त्यांचे विशेष कौतुक केले आहे. या पार्श्वभूमीवर अन्य कारखान्यांनीही त्यांचा आदर्श घ्यावा, असे आवाहन संघटनेने केले आहे.

रयत क्रांती संघटनेतर्फे कृष्णा साखर कारखान्याचे अध्यक्ष डॉ. सुरेश भोसले आणि 'जयवंत शुगर'चे विनायक भोसले यांचा सचिन नलवडे यांनी सत्कार केला आहे. जिल्हाध्यक्ष शिवाजी पाटील, विशाल पुस्तके, अशोक लोहार, अनिकेत ठोंबरे, नितीन शिर्के, संतोष कणसे, सचिन नांगरे, प्रसाद धोकटे, शंकर आतकारे आदी उपस्थित होते.

नलवडे म्हणाले, गेल्या काही वर्षांत जिल्ह्यातील ऊसदराचा प्रश्न मार्गी लावण्यात कृष्णा कारखान्याने पुढाकार घेतला आहे.

# मुंबई-गोवा महामार्गाची उर्वरित कामे ५० दिवसांत पूर्ण होणे अशक्य

**हर्षद कशाळकर, विनोद कदम**

**अलिबाग/रत्नागिरी :** मुंबई गोवा महामार्गाचे उर्वरित काम मेअखेर पर्यंत पूर्ण होईल अशी ग्वाही केंद्रीय भूपृष्ठ वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी दिली आहे. मात्र रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यातील उर्वरित कामांचे प्रमाण आणि त्याची गती लक्षात घेतली तर ५० दिवसांत हे काम पूर्ण होणे अशक्य आहे. त्यामुळे आता आश्वासने नको उर्वरित कामांना गती देण्याची मागणी कोकणवासीयांकडून केली जात आहे.

मुंबई-गोवा महामार्गाच्या पहिल्या टप्प्यातील पळस्पे ते इंदापूर या कामाला २०११ साली सुरुवात झाली होती. २०२६ उजाडले तरी हे काम पूर्ण झालेले नाही. नागोठणे, कोलाड येथील पुलांची कामे अजूनही अपूर्ण आहेत. इंदापूर ते झाराप या टप्प्यातील चौपदरीकरण आणि काँक्रीटीकरणाला २०१४ साली सुरुवात झाली.

हे कामही २०२६ एप्रिल महिना उजडला तरी पूर्ण झालेले नाही. रायगड जिल्ह्यात इंदापूर आणि माणगाव दरम्यान बाह्यवळण रस्त्यांची कामे सध्या अपूर्ण आहेत.



जी कामे सरू आहेत ती अत्यंत संथ गतीने सुरू आहेत. उड्डाणपुलांचे गर्डरही बसवलेले नाहीत, रस्त्यावर कामगार दिसत नाहीत. त्यामुळे महामार्गाचे काम ५० दिवसांत पूर्ण होणे अशक्य आहे.
**- अशोक परब,** कोकणवासीय

गडकरी साहेब कोकणात येताना हवाई मार्गाने येण्याऐवजी रस्ते मार्गाने आले असते, तर त्यांना मुंबई-गोवा महामार्गाच्या सद्यःस्थितीचा अचूक अंदाज आला असता, तसेच उर्वरित कामे किती दिवसांत पूर्ण होऊ शकतील याची अचूक जाणीव त्यांना झाली असती.
**- रामशेठ रेडीज,** सदस्य, महामार्ग संघर्ष समिती, चिपळूण

रत्नागिरी जिल्ह्यात आरवली ते कांटेदरम्यानच्या महामार्गाचे काम अजूनही पूर्ण झालेले नाही. पाली, हातखंबा, संगमेश्वरदरम्यान महामार्गाच्या कामाला अजूनही गती मिळालेली नाही. चिपळूण येथील उड्डाणपुलाचे कामही अद्याप पूर्ण झालेले नाही. परशुराम घाटातील गॅबियन वॉल्सची कामेही मार्गी लागलेली नाहीत. सद्यःस्थितीत महामार्गाचे काम अतिशय धिम्या गतीने सुरू आहेत. त्यामुळे उर्वरित कामे ५० दिवसांत पूर्ण करणे आवश्यक असल्याचे मत कोकणवासीयांकडून व्यक्त केले जात आहे.

# राज्यात नवीन १० वैद्यकीय महाविद्यालये

## 'एमबीबीएस'च्या एक हजार जागा वाढणार- हसन मुश्रीफ

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**सांगली :** राज्यात सध्या ३६ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये कार्यरत असून, नव्याने १० महाविद्यालयांना मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे 'एमबीबीएस'च्या नवीन एक हजार जागा विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध झाल्या असल्याचे वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांनी येथे सांगितले. यासाठी जपानच्या 'जायका' बँकेकडून सुमारे चार हजार कोटी रुपयांचे कर्ज मिळणार असून, त्यातून ही नवीन महाविद्यालये व नर्सिंग शिक्षणाचा विस्तार होणार असल्याचेही ते या वेळी म्हणाले.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज येथील अत्याधुनिक अतिदक्षता कक्षाचे लोकार्पण व केंद्रपुरस्कृत सभागृह व वसतिगृहांच्या कामांचे भूमिपूजन, तसेच सांगली येथील मॉड्युलर ऑपरेशन थिएटरचे उद्घाटन वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते झाले. या वेळी आमदार इद्रिस नायकवडी, आमदार सुधीर गाडगीळ, जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. प्रकाश गुरव, उपअधिष्ठाता डॉ. श्रीकांत अहंकारी, वैद्यकीय उपअधीक्षक डॉ. रुपेश शिंदे आदी उपस्थित होते.



**मिरज वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात अत्याधुनिक अतिदक्षता कक्षाचे लोकार्पण वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते झाले.**



**सांगलीच्या जिल्हा सामान्य रुग्णालयात अत्याधुनिक यंत्रासह मॉड्युलर ऑपरेशन थिएटरचे लोकार्पण करण्यात आले.**

मुश्रीफ या वेळी म्हणाले, की सांगली सिव्हिल हॉस्पिटलमध्ये राज्य शासनाच्या निधीमधून सात 'मॉड्युलर ऑपरेशन थिएटर' मंजूर करण्यात आले. त्यातील पाच 'मॉड्युलर ऑपरेशन थिएटर'चे लोकार्पण करण्यात आले. त्यासाठी राज्य शासनाने सुमारे २० कोटी रुपयांचा निधी मंजूर करून दिला आहे. याचा गोरगरीब रुग्णांना फायदा होणार आहे.

'मिरज सिव्हिल हॉस्पिटल'मध्ये ४० बेडचा 'मॉड्युलर आयसीयू ' राज्य शासनाच्या निधीतून तयार करण्यात आला आहे. त्यामुळे मोफत तसेच कमी पैशांमध्ये वैद्यकीय सुविधा देणे शक्य झाले आहे. राज्य शासनाने राज्यात पहिली डिजिटल ब्रेन अँन्जिओग्राफी मशिन मिरजमध्ये मंजूर करून सुरू केली आहे. त्यामुळे गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया करणे सोपे झाले आहे. याशिवाय रुग्णालयात लिथोट्रिप्सी, आधुनिक लॅप्रोस्कोपी, इको व सोनोग्राफी मशिन उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. मिरज येथे कॅन्सर उपचारांसाठी 'एल-३' स्तराची सुविधा विकसित करण्यात येणार असून, केमोथेरपी व रेडिएशन सेवा सुरू करण्याचे नियोजन आहे. तसेच पीपीपी तत्त्वावर कॅथलॅब उभारून बायपास व अँजिओप्लास्टीसारख्या शस्त्रक्रिया सुरू करण्याचा मानस त्यांनी या वेळी व्यक्त केला. वैद्यकीय उपअधीक्षक डॉ. रुपेश शिंदे यांनी प्रास्ताविक केले. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. प्रकाश गुरव यांनी आभार मानले.

## 'विहिंप' पदाधिकाऱ्यावर अत्याचाराच्या प्रयत्नाचा गुन्हा

**अमरावती :** संपूर्ण राज्यभरात परतवाडा येथील लैंगिक शोषण प्रकरणाची चर्चा सुरू असताना तिवसा पोलीस ठाण्याच्या हद्दीत आणखी एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. आरोपीने एका महिलेला वारंवार फोन करून शारीरिक सुखाची मागणी केल्यानंतर पीडित महिला जेव्हा आरोपीला जाब विचारण्यासाठी गेली, तेव्हा त्याने तिच्यावर अत्याचाराचा प्रयत्न केला. रूपेश राऊत (५०, रा. गुरुदेवनगर) असे या आरोपीचे नाव असून तो विश्व हिंदू परिषदेचा अमरावती जिल्हा महामंत्री असल्याचे सांगितले जात आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी फरार झाला आहे.

आरोपीने ३६ वर्षीय पीडित महिलेला मध्यरात्री तिच्या भ्रमणध्वनीवर वारंवार संपर्क साधला. महिलेकडे शारीरिक सुखाची मागणी केली. दुसऱ्या दिवशी ही महिला आरोपीचे घर शोधत त्याच्याकडे पोहचली व एवढ्या रात्री फोन का केला, असे विचारले. त्यावेळी त्याने महिलेवर अत्याचाराचा प्रयत्न केला. पीडित महिलेने आरडाओरड केल्यानंतर या प्रकाराची वाच्यता केल्यास तुझ्या मुलाचे काही खरे नाही, असे सांगून पीडितेच्या मुलाला मारण्याची धमकी दिली.

आरोपी रूपेश राऊत हा अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळाच्या गुरुकुंज आश्रम येथील अध्यात्म संस्कार समितीचा सदस्य देखील आहे.

**उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक**
UJJIVAN
**नोंदणीकृत कार्यालय:** ग्रेप गार्डन, नं. 27, 3रा "ए" क्रॉस, 18 वा मुख्य, 6 वा ब्लॉक, कोरमंगल, बेंगळुरू- 560095, कर्नाटक.
**क्षेत्रीय कार्यालय-** 7वा मजला, अलमॉंट आयटी पार्क, स. क्र. 8, खराडी-मुंढवा बायपास, खराडी गाव, पुणे- 411014.

**जाहीर लिलाव सूचना**

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) आणि 9 च्या तरतुदीसह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट (सरफेसी कायदा) 2002 अंतर्गत विक्रीसाठी जाहीर सूचना.**

निम्नस्वाक्षरीकार हे उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि. चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सरफेसी कायद्याच्या कलम 13(4) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा ताबा घेतला आहे. विशेषतः कर्जदारांना आणि सामान्यतः जनतेला सूचित करण्यात येते की बँकेच्या थकबाकीच्या वसुलीसाठी खाली नमूद केलेल्या खात्यातील तारण मालमत्तेचा जाहीर लिलाव **"जसे आहे तेथे आहे" व "जसे आहे जे काही आहे"** या तत्वावर खालीलप्रमाणे विहित केलेल्या दिनांकास आयोजित करण्यात येईल.

| अ. क्र. | कर्ज खाते क्र. / शाखा | कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदार / गहाणदार यांचे नाव | 13(2) सूचना दिनांक / थकबाकी देय (रु. मध्ये) | ताबा दिनांक | राखीव किंमत रु. मध्ये ---------- बयाणा रक्कम ठेव रु. मध्ये |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 4450210050 00 0044 / 4450-AHMEDNA-GAR | **1. मनीष श्रीचंद हसिजा, 2. काव्या मनीष हसिजा,** **दोघांचाही पत्ता:** फ्लॅट क्र. 103, स. क्र. 63/1, किशन पॅलेस अपार्टमेंट, निर्मल नगर, फकीरवाडा, अहमद नगर, महाराष्ट्र-414001. **अ. क्र.1 तसेच येथे :** शान असोसिएट्स, बंबईवाला स्वीट्स जवळचा प्लॉट, पाईपलाईन रोड, सावेदी, अहमदनगर, महाराष्ट्र-414003 आणि प्लॉट क्र. 79/ए, औदुंबर अपार्टमेंट, आष्टा पाईप लाईन रोड, सावेडी, अहमदनगर, महाराष्ट्र-414003. **अ. क्र. 2 तसेच येथे:** फ्लॅट नं. 9, पार्वती टॉवर्स, रेणाविकर कॉलनी, पाईपलाईन रोड, सावेदी, अहमदनगर, महाराष्ट्र-414003. | 13.11.2024 / Rs. 1189317.17 as on 07.11.2024 | 24.01.2026 | Rs. 1730000/- ---------- Rs. 173000/- |

**स्थावर मालमत्तेचे वर्णन:** पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, फ्लॅट क्र. एस.एस.-203, दुसऱ्या मजल्यावर, "किशन पॅलेस" नावाने ओळखले जाणारे अपार्टमेंट, मोजमाप क्षेत्रफळ 46.28 चौ. मीटर, बांधकाम क्षेत्र + बाल्कनी क्षेत्र 6.70 चौ. मीटर. त्याचे एकूण विक्रीयोग्य क्षेत्र 58.99 चौ. मीटर. प्लॉट क्र. 35 यावर रीतसर बांधलेले, एकूण प्लॉट क्षेत्रफळ 415 चौ. मीटर, सर्व्हे क्र. 63/1 पैकी, गाव-सावेडी, तालुका- नगर, जिल्हा- अहमदनगर येथे स्थित, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगरच्या हद्दीत. जमिनीच्या चतुःसीमा :- पूर्व : प्लॉट क्र. 34, दक्षिण : सर्वे क्र. 56, पश्चिम : 6.00 मीटर रस्ता आणि प्लॉट क्र. 44, उत्तर : प्लॉट क्र. 36. आणि फ्लॅटच्या चतुःसीमा : पूर्व : फ्लॅट क्र. एस-201, दक्षिण : फ्लॅट क्र. एस.एस. 202, पश्चिम : रस्ता आणि बाजूची जागा, उत्तर : बाजूची जागा. **मनीष श्रीचंद हसीजा आणि काव्या मनीष हसीजा यांच्या मालकीचे.**

**मालमत्तेच्या तपासणीचा दिनांक आणि वेळ : 23-04-2026 आणि 21-05-2026 रोजी स. 11 ते दु. 4 वा. दरम्यान**
**बोली आणि बयाणा रक्कम ठेव सादर करण्याची दिनांक : 25-05-2026 रोजी स. 11 ते सायं. 5 वा.**
**लिलाव दिनांक आणि वेळ : 26-05-2026 रोजी स. 11:00 ते दु. 2:00 वा.**
**बयाणा रक्कम ठेव (ईएमडी) भारतीय रुपये मध्ये ("उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि." च्या नावे डिमांड ड्राफ्टद्वारे भरले जावे).**

**बोली सादर करण्याचे ठिकाण आणि लिलाव : उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि., मुकुंद आयकॉन, आयुर्वेदिक हॉस्पिटलसमोर, माळीवाडा, टिळक रोड, अहमद नगर, महाराष्ट्र-414001. (संपर्क : दीपक मंत्री - 9561157757, अक्षय अंधारे - 8600060500)**

**अटी व शर्ती:- ई-लिलाव "जशी आहे जेथे आहे", "जशी आहे जे काही आहे" आणि "तेथे जे काही आहे" तत्त्वावर आयोजित करण्यात येईल.**

**1.** प्राधिकृत अधिकारींना असलेले उत्तम ज्ञान व माहितीच्या अनुसार तेथे कोणत्याही मालमत्तेवर भार नाही. तथापि, स्वारस्य असलेल्या बोलीदारांनी त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी लिलावात ठेवलेल्या मालमत्तेवरील भार, नामाधिकार तसेच मालमत्तेस प्रभावी ठरणारे दावे / हक्क / देणी यासंबंधित स्वतंत्र चौकशी करावी. ई-लिलाव जाहीरात बँकेचे कोणतेही प्रतिनीधीत्व किंवा कोणतीही बांधिलकी ठेवत नाही किंवा असल्याची मानीव ठरत नाही. मालमत्तेची विक्री बँकेला ज्ञात असलेल्या ज्ञात नसलेल्या सर्व विद्यमान व भावी भारसह विकण्यात येत आहे. प्राधिकृत अधिकारी / सुरक्षित धनको कोणत्याही त्रयस्थ पक्षकाराचे दावे / हक्क / देणी याकरिता जबाबदार असणार नाहीत. **2.** बोली सादर करण्यापूर्वी मालमत्तेची पाहणी आणि मत्ता व विनिर्देश याबाबत स्वतःचे समाधान करुन घेण्याची जबाबदारी बोलीदारांची असणार आहे. लिलावात ठेवलेल्या मालमत्तेच्या पाहाणीकरिता प्रत्येक मालमत्तेच्या वर्णनानुसार नमूद केल्याप्रमाणे स्वारस्य असलेल्या बोलीदारांना अनुमती देण्यात येईल. **3.** इच्छुक बोलीदारांनी वर नमूद केल्याप्रमाणे लिलावाच्या तारखेच्या एक दिवस आधी निम्नस्वाक्षरीकार प्राधिकृत अधिकाऱ्यासमोर त्यांची बोली सादर करावी. **4.** ई-लिलाव उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक मान्यताप्राप्त ई-लिलाव सेवा प्रदाता- **मे. सी1 इंडिया प्रा. लि., संपर्क व्यक्ती - प्रभाकरन एम - (मो. क्र. 7418281709)** द्वारे आयोजित करण्यात येईल. इच्छुक बोलीदारांना संकेतस्थळावरील मालमत्तांच्या तपशीलासाठी **https://www.bankeauctions.com** किंवा **https://www.ujjivansfb.in/e-auctions** ला भेट द्यावी आणि बोलीमध्ये भाग घेण्यासाठी त्यांनी **https://www.bankeauctions.com** या पोर्टलवर त्यांची नावे नोंदवावीत आणि त्यांचा युजर-आयडी आणि पासवर्ड मोफत मिळवावा असा सल्ला देण्यात येत आहे. संभाव्य बोलीदार सेवा प्रदाता **मे. सी1 इंडिया प्रा. लि., हेल्पलाइन नंबर- 7291918824, 25, 26, सपोर्ट ईमेल आयडी:- support@bankeauctions.com, लिलाव पोर्टल- https://www.bankeauctions.com** यांच्याकडून ई-लिलावावर ऑनलाइन प्रशिक्षण घेऊ शकतात. **5.** सर्वोच्च बोली लावणाऱ्या/देऊ केलेले यांना सुरक्षित धनको, म्हणजेच, उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि. द्वारे बोली स्वीकारल्याच्या अधीन राहून, मालमत्ता विकली जाईल. तथापि, निम्नस्वाक्षरीकार यांना आवश्यक वाटल्यास इंटर-से-बिडिंगला परवानगी देण्याचा पूर्ण अधिकार आहे. कोणतेही कारण न देता कोणतीही ऑफर/निविदा स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार प्राधिकृत प्राधिकारी यांना आहे. **6.** यशस्वी बोलीदाराची बयाणा रक्कम ठेव (ईएमडी) विक्री विचाराधीन भाग म्हणून ठेवून घेण्यात येईल आणि/अयशस्वी बोलीदारांची बयाणा रक्कम परत करण्यात येईल. बयाणा रक्कम ठेवीवर कोणतेही व्याज मिळणार नाही. यशस्वी/बोलीदाराने प्राधिकृत अधिकाराद्वारा बोली किंमतीच्या स्वीकृतीच्या 24 तासाच्या आत किंमतीच्या 25% ठेव,/आधीच प्रदान केलेल्या इरठेचे समायोजन करुन, जमा करवायची आहे आणि उर्वरित 75% रक्कम विक्रीच्या 15व्या दिवशी किंवा तत्पूर्वी किंवा प्राधिकृत अधिकारीच्या एकमेव स्वेच्छाधिकारावर व लिखित मान्यतेनुसार असा वाढीव कालावधी कोणत्याही परिस्थितीत 3 महिन्यांपेक्षा जास्त नसेल अशा विस्तारित कालावधीच्या आत भरावयाची आहे. यशस्वी बोलीदाराद्वारा प्रदान करण्यात कसूर झाल्यास, प्रस्तावाद्वारा/आधीच भरलेली रक्कम जप्त होण्यास पात्र ठरेल आणि मालमत्ता पुनर्लिलावाकरिता ठेवण्यात येईल आणि कसूरदार/ऋणकोचा मालमत्ता/रकमेबाबत कोणताही दावा/हक्क असणार नाही. **7.** प्रकाशन सक्ती असलेल्या प्रमुख कलमाच्या अधीन आहे. **8.** शेवटच्या क्षणी बोली सादर करणे बोलीदारांनी स्व - हितार्थ टाळावे ज्याकरिता उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक किंवा/सेवा पुरवठाकार कोणतीही चूक व अपयश (इंटरनेट फेल्युअर / पॉवर फेल्युअर, इ.) जबाबदार नसतील. अशा / गंभीर स्थिती टाळण्याकरिता बोलीदारांना विनंती करण्यात येते की त्यांनी पॉवर सप्लाय बॅक- अप, इ. सारखी/सर्व पर्यायी/आवश्यक व्यवस्था करावी जेणेकरुन ते अशा परिस्थितीवर मात करण्यास सक्षम असतील आणि/लिलावात यशस्वीरित्या सहभागी होण्यास सक्षम ठरतील.

**तारण असलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी शेड्यूल केलेल्या जाहीर लिलावाबद्दल वरील नावे असलेले कर्जदार/जामीनदार/गहाणदार यांना ही सूचना आहे.**

ठिकाण: महाराष्ट्र, दिनांक: 17.04.2026 — स्वा./- प्राधिकृत अधिकारी, उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक

